# नियमित दिवाणी दावा क्र.७५/२०२३

## <u>निशाणी क्र.३३ वरील आदेश</u>

## <u>CRN No. MHRT060004672023</u>

प्रस्तुत कामी वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ रविंद्र शिवराम पानवलकर यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. १ हे मयत झाल्याचे त्यांना दि.२४.०८.२०२३ रोजी बेलिफ रिपोर्टवरून प्रथमतः समजले. सदर प्रतिवादी क्र. १ यांना प्रभावती रविंद्र पानवलकर, पल्लवी रविंद्र पानवलकर, प्रतिक्षा रविंद्र पानवलकर व संपदा रविंद्र पानवलकर असे कायदेशीर वारस असून त्यांच्याव्यतिरिक्त प्रतिवादी क्र. १ यांना अन्य कोणीही वारस नाहीत. सबब, वादी यांचा अर्ज मंजूर करण्याबाबत विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन कथन केले की, सदर अर्जाबाबत योग्य ते आदेश पारित करण्यात यावेत. तसेच तोंडी युक्तीवादादरम्यान प्रतिवादीतर्फे हरकत नोंदवण्यात आली. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा ठरावाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे दाव्याचे कामी आवश्यक असणारे पक्षकार अभिलेखावर असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचे अर्जात तथ्य वाटते. अर्ज, प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. दाव्याचे स्वरुप पाहता, दावा कायदेशीरपणे गुणदोषांवर चालवून अंतिमरित्या निकाल होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वानुसार वादी यांना प्रतिवादी यांचे वारस म्हणून रेकॉर्डवर घेणेस तशी निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्ती करणेची वादी यांना परवानगी देणे योग्य होईल असे वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेवून योग्य ती दुरुस्ती वादी यांनी विहीत कालावधीमध्ये करुन दावा दुरुस्त प्रत दाखल करावी.

**दापोली**
**दिनांक– ०३/०९/२०२४.**

**सही/–**
**(श्रीम. रो. ब. यादव)**
**दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, दापोली,**
**ता. दापोली.**

CERTIFICATE

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same words as per original Judgment. | |
| Name of Stenographer | Shri. V. V. Bamane |
| Court Name | Smt. R. B. Yadav<br>Civil Judge J.D.& J.M.F.C., Dapoli. |
| Date of Judgment | 03.09.2024 |
| Judgment Signed by P.O. on | 03.09.2024 |
| Judgment uploaded on | 05.09.2024 |